# प्रेसनोट

जा.क्र. पोउआ/वाहतूक/ /२०१८ पुणे शहर, दिनांक- १९/१०/२०१८

**विषय :- " No Traffic Rule Violation Zone " अनुषंगाने वाहनचालकांनी वाहतुकीचे नियमांचे पालन करण्याकरीता जनजागृतीपर दुचाकी रॅलीचे आयोजन करण्यात आले बाबत.**

---

पुणे शहरातील वाहतूक सुरक्षित व सुरळीत चालण्यासाठी वाहतूक शाखा,पुणे महानगरपालिका,प्रादेशिक परिवहन विभाग,पीएमपीएमएल विभाग यांचेकडून नियमित प्रयत्न करण्यात येत असून, वाहनचालकांना शिस्त लागून अपघाताचे प्रमाण कमी व्हावे याकरीता वाहतूक शाखेतर्फे वेळोवेळी विशेष मोहिम राबवून वाहतूक नियमभंग करणा-या वाहन चालकांवर कारवाई करण्यात येते.

वाहतुक शाखा पुणे शहर यांनी,पुणे शहरातील गर्दीचे १०० चौक निश्चित केले असून ते चौक/ रोड हे नो-व्हायोलेंशन झोन तयार केले आहेत सदर ठिकाणी दिनांक-१९/१०/२०१८ रोजी,पासून पुढील ७ दिवस सकाळ,संध्याकाळ असे दोन वेळा, पुणे शहर वाहतुक शाखेकडील अधिकारी,कर्मचारी तसेच प्रत्येक पोलीस स्टेशनकडील १५ कर्मचारी, पुणे महानगरपालिका,प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय,एमएसईबी विभाग असे संयुक्तपणे वाहतुकीचे नियमभंग करणारे वाहनचालकांवर कारवाई करणार आहेत. तसेच वाहतुकीस अडथळा होणारे विद्युत पोल हलविणे, सिग्नलला अडथळा होणा-या झाडांच्या फांद्या छाटणे, रोडरील अनाधिकृत हॉकर्स हटविले जाणार आहेत.

सदर कारवाईचे अनुषंगाने शहरातील वाहतुक सुरळीत व सुरक्षित चालण्याकरीता, वाहनचालकांनी वाहतुकीचे नियम पाळावे त्यांचेत जनजागृती होण्यासाठी प्रातिनिधीक स्वरुपात दिनांक- १९/१०/२०१८ रोजी सकाळी ११.३० वा. शाहीर अमरशेख चौक,मंगळवारपेठ पुणे ते जेधे चौक, स्वारगेट पुणे पर्यंत दुचाकी रॅलीचे काढण्यात आली होती. सदर रॅलीमध्ये मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर, श्री. के वेंकटेशम्, मा.पोलीस सह आयुक्त,पुणे शहर, श्री.शिवाजी बोडखे, पोलीस उप आयुक्त,वाहतुक श्रीमती- तेजस्वी सातपुते, पोलीस उप आयुक्त, श्री.गायकवाड,पोलीस उप आयुक्त,श्री.बावचे, तसेच वाहतुक शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त व वाहतुक विभागाचे प्रभारी अधिकारी, कर्मचारी यांनी सहभाग घेतला होता. मा.पोलीस आयुक्त व मा.पोलीस सह आयुक्त यांनी प्रत्यक्ष सहभाग घेऊन शहरातील वाहतुक सुरळीत व सुरक्षीत होण्यासाठी प्राधान्य दिले असून त्याप्रमाणे निश्चित केलेल्या नो-व्हायोलेंशन झोनवर कार्यवाही आज रोजी पासून सुरु होत आहे.

तरी वाहन चालकांना याद्वारे आवाहन करण्यात येते की, वाहतूकीच्या नियमांचे तंतोतंत पालन करुन शहरातील वाहतुक सुरळीत करण्यात योगदान द्यावे.